# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्सनं.- ०२०- २६१२२२१७

ई मेल आय डीक्र.dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune .com

जाक्र./शिउसं/पुवि/उमाशि-१/२०१६-१७/

दिनांक- 1.4.2017

प्रति,

शिक्षणाधिकारी,

(प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद,

पुणे/अहमदनगर/सोलापूर

विषय :- स्वाईन फ्लूबाबत शालेय स्तरावर जनजागृती करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की,सदयस्थितीत सर्व शाळांमध्ये वार्षिक परीक्षा चालू असल्याने स्वाईन फ्लू पासून काळजी घेणेबाबत शालेय स्तरावर संस्था, शिक्षक पालक संघ यांच्या सहकार्याने जनजागृती करण्यात यावी कारण स्वाईन फ्लूची लक्षणे सर्व साधारण फ्लूसारखीच असतात यात थंडी, ताप, सर्दी, खोकला,घसादुखी,अंगदुखी,पोटदुखी,मळमळ,उलटी,जुलाब इ. लक्षणांचा समावेश असतो. केवळ लक्षणांच्या सहाय्याने स्वाईन फ्लूचे निदान होऊ शकत नाही फक्त प्रयोगशाळेतच केलेल्या निरीक्षणावरून स्वाईन फ्लू आहे किंवा नाही हे स्पष्ट होऊ शकते.

या बाबत आपल्या जिल्हयातील शाळांमध्ये स्वाईन फ्लूची लागण झालेला विद्यार्थी आढळल्यास त्याबाबत योग्य ती खबरदारी घेऊन असे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये त्याकरीता त्यांची पुनर्परीक्षा घेऊन शैक्षणिक नुकसान होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी, असे सर्व शाळांना सूचित करण्यात यावे व तसे केल्याचे या कार्यालयास कळवियात यावे.

MRaut

(मिनाक्षी राऊत)

सहा. शिक्षण संचालक

पुणे विभाग पुणे-०१